शनिवार, दि. १२ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी आमदार निधी देणार- आ. खोतकर

### महात्मा फुले यांचे विचार वर्तमान व भविष्यातही गरजेचे - संतोष खांडेकर

**जालना । प्रतिनिधी -** शहरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी शहर महापालिकेने जागा द्यावी व सदरील पुतळा उभारण्यासाठी लागेल तेव्हढा आमदार निधी देणार असल्याची ग्वाही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली. तर महात्मा जोतिबा फुले यांनी १९ व्या शतकात भारतीय समाजव्यवस्थेचे सूक्ष्म निरीक्षण करून समानतेचे विचार मांडले. त्यामुळे महात्मा फुले यांचे विचार वर्तमान व भविष्यकाळातही नितांत आवश्यक असल्याचे प्रतिपादन जालना शहर महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी दिले.

महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती ११ एप्रिल २०२५ रोजी जालना शहर मनपा परिसरात लाडुचा प्रसाद वाटून उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी उभयंते बोलत होते.

यावेळी पोलिस अधिक्षक अजयकुमार बंन्सल, उपायुक्त प्रियंका राजपुत, श्रीमती गायकवाड, जालना शहर मनपाचे कार्यालयीन अधिक्षक विजय फुलंब्रीकर, आनंद अंभोरे, राजेश कुरलिये, अरूण वानखेडे, अभियंता सऊद, बंडु चव्हाण, लेखा विभागाचे वरिष्ठ लिपीक सचिन मेहरा, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, भाऊसाहेब घुगे, धरम इंगळे, सुधाकर निकाळजे, रोहिदास गंगातिवरे, दिनकर घेवंदे, योगेश रत्नपारखे, लक्ष्मण ईधाटे,गंगुबाई वानखेडे, मंगला खांडेभराड, बाबासाहेब वानखेडे, मंजु घायाळ, वंदना



खांडेभराड, पंडीतराव भुतेकर, दिपक वैद्य, संतोष जमधडे, शंकर घोडके, अमोल धानुरे, शिवकुमार राऊत, सचिन वानखेडे, कृषी अधिकारी कापसे, अमरदिप शिंदे, नितीन इंगळे, ड. रामेश्वर खांडेभराड, अमोल अंभोरे, सुरेश रत्नपारखे,पोलिस निरीक्षक माने, कदीम जालनाचे पो. नि. माने, गणेश जाधव, कडुबा वाकीकर, संतोष गायकवाड,गणेश चौधरी, वैजीनाथ नागरे, विमलबाई लोखंडे, पान २ वर

## ग्रामपंचायतींसाठी तालुकानिहाय सरपंच पदाची आरक्षण अधिसूचना जारी

**जालना । प्रतिनिधी -** यापूर्वी प्रसिध्द केलेल्या सर्व अधिसूचना अधिक्रमीत करुन अधिसूचना दि. ०५ मार्च, २०२५ राजपत्रात प्रसध्दि झालेल्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली असून अधिसूचनेन्वये अनुसूची २ मध्ये दर्शविण्यात आल्या प्रमाणे अनुसूचित जाती, अनुसचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यातील महिलांसह) राज्यातील जिल्हा निहाय सरपंच पदाचे आरक्षण अनुसूची - १ अनुसूची - २ अन्वये वाटप करण्यात आले आहे.

त्यानुसार जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी अधिसूचनेद्वारे तालुका निहाय सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी व महिलांसाठी पाच वर्षासाठी (सन २००५ ते सन २०३० दरम्यान गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरीता) आरक्षीत करुन संख्या निश्चित केली आहे. जालना तालुका-ग्रामपंचायत संख्या १२३, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. १९, महिला ९, अनुसूचित जमाती अ.ज. २, महिला १, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. ३३, महिला १६ आणि खुला प्रवर्गासाठी ६९, महिला ३४.बदनापूर तालुका-ग्रामपंचायत संख्या ७९, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. ११, महिला ६, अनुसूचित जमाती अ.ज. १, महिला ०, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. २१, महिला ११ आणि खुला प्रवर्गासाठी ४६, महिला २३.भोकरदन तालुका-ग्रामपंचायत संख्या १२४, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. १६, महिला ८, अनुसूचित जमाती अ.ज. ५, महिला ३ , नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. ३४, महिला १७ आणि खुला प्रवर्गासाठी ६९, महिला ३४.जाफ्राबाद तालुका-ग्रामपंचायत संख्या ७२, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. १३, महिला ६, अनुसूचित जमाती अ.ज. २, महिला १ , नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. १९, महिला १० आणि खुला प्रवर्गासाठी ३८, महिला १९.परतुर तालुका-ग्रामपंचायत संख्या ८१, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. ११, महिला ५, अनुसूचित जमाती अ.ज. १, महिला ० , नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. २२, महिला ११ आणि खुला प्रवर्गासाठी ४७, महिला २४.मंठा तालुका-ग्रामपंचायत संख्या ९२, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. १५, महिला ८, पान २ वर

युवा आदर्श

राम दूत ...

हनुमान बलशाली
शक्तीमूर्त गदाधारी
शरणागता सावरी
क्षणार्धा संकटहारी
जितेंद्रीय बुध्दीवंत
हनुमंत तू ब्रह्मचारी
सर्व विद्या सुप्राप्त
जाणितो वेद चारी
चिरंजीव रे आजीव
त्रिलोका तू वावरी
भूतप्रेत हो भयभीत
शरणागतास सावरी
कशी असावी भक्ती
राघव चित्र चितारी
निरामय निराकारी
वस्त्र रेशीम जरतारी
राम आज्ञा शिरोधार्य
सेतू बांधला सागरी
तरंगे अवजड दगड
राघव मंत्र उजागरी
राम दूत सार्थ झाला
जाळली लंका नगरी
दशाननास अहंकारी
धडा शिकवी जिगरी
प्रसन्न हो अंजनीसूत
राम नाम येता वैखरी
राम कवच अभेद्यच
भोवती हो खरोखरी

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा




क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माजी आ. कैलास गोरंटयाल यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. त्याप्रसंगी माजी पं.स.सदस्य जालिंदर डोईफोडे, दत्ता घुले, शिवाजी वाघ, अरूण घडलिग, अंकुश चव्हाण, धीरज भगत, किशोर भुरेवाल आदींची उपस्थिती होती. (छाया - दीपक इगेवार)

## जिल्हा प्रशासनामार्फत जिल्ह्याला यलो अलर्ट

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. ११ एप्रिल व दि. १२ एप्रिल, २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व नागरीकांनी खालीलप्रमाणे दक्षता घेणेचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

नागरिकांनी मेघगर्जनेच्या खेळी, बोजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्यूत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, पान २ वर

## रक्ताने पत्र लिहून अपहार प्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांना निलंबीत करण्याची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात तरुणाने शिक्षणमंत्र्यांना तरुणाने रक्ताने लिहिलेले पत्र पाठवले.

जालना जिल्ह्यातील परतूर येथील शिक्षण विभागात १ कोटी ३४ लाख रुपयाचा भ्रष्टाचार झाल्याची घटना मागील आठवड्यात समोर आली. शिक्षकांच्या आयकर भरणा असलेल्या खात्यातून हि रक्कम शालार्थ समन्वयकाने स्वतः च्या खात्यात वर्ग करून घेतली होती.यानंतर सामाजिक कार्यकर्ता नारायण लोखंडे याने जिल्हा परिषद कार्यालयात गळ्यात मागण्यांचे बॅनर घालून अनोखे आंदोलन केले होते. त्यानंतर सिईओंनी संबंधितांचे निलंबन करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. मात्र अद्यापही गुन्हे दाखल झालेले नाही. याला जबाबदार शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ आहे. आयुक्त आणि सिईओ यांनी आदेश देऊनही शिक्षणाधिकाऱ्यांनी याच शिक्षकांना शालार्थ पदावर् कायम ठेवले व यंत्रणेकडून भ्रष्टाचार करून घेतला.त्यामुळं शिक्षणाधिकाऱ्यांना तात्काळ निलंबीत करून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी व फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्याची मागणी नारायण लोखंडे या तरुणाने शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.रक्ताने पत्र लिहून ही मागणी करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शिक्षणमंत्र्यांना हे पत्र पाठविण्यात आले.

## ‘बचत गटाला बाजारपेठ मिळवून द्या, वैयक्तिक लाभांच्या योजना राबवा’

### विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी जाणून घेतल्या महिलांच्या समस्या; अडचणी सोडविण्याचे आश्वासन



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** साहेब आमच्या प्रभाग संघासाठी कार्यालयाला जागा पाहिजे, साहेब बचत गटातून कर्ज मिळाल आणि आम्ही आमच्या व्यवसायात यशस्वी झालो, साहेब बचत गटाचे पहिले कर्ज मिळाले दुसऱ्या कर्जाच सांगा, बचत गटाला बाजारपेठ मिळवून द्या, बचत गटासोबत वैयक्तिक लाभांच्या योजना राबवा, अशा अनेक विषयांवर मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील लाभार्थी महिलांनी ‘संवाद मराठवाडयाशी’ या उपक्रमाअंतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्याशी संवाद साधला. विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी महिलांच्या अडचणी समजून घेत तत्परतेने यावर मार्ग काढून अडचणी सोडवू असे सांगतांना संबंधित यंत्रणांनी महिलांनी मांडलेल्या अडचणी तातडीने सोडवाव्यात असे निर्देश यावेळी दिले.

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील नागरिक आपल्या विविध कामानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. आपल्या प्रशासकीय समस्यांचे निवारण करून घेण्यासाठी नागरिक येत असतात, मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा ‘संवाद मराठवाडयाशी’ हा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील या नाविण्यपूर्ण उपक्रमाचा प्रारंभ आज दुपारी ४ वाजता झाला.

यावेळी सहआयुक्त सुरेश बेदमुथा, डॉ.अनंत गव्हाणे, एनआयसीचे अनिल थोरात, यांच्यासह संबंधित जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यातील वाडवाळ ता.चाकूर येथील आदर्श प्रभाग संघाच्या सुनिता भाऊसाहेब श्रीनाथे यांनी आपल्या प्रभाग संघाला कार्यालयासाठी जागा द्यावी, तसेच बिनव्याजी कर्ज द्यावे, सोबतच लखपती दिदी मुद्रा लोन याबाबत मार्गदर्शन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावर विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांना तत्परतेने कार्यवाही करून अहवाल सादर करावा असे निर्देश दिले.

बीड जिल्ह्यातील घाटनांदूर येथील महिला बचत गटाच्या महिला संवादात सहभागी झाल्या. आमच्या बचत गटाला बाजारपेठेबाबत मदत करा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. परभणी जिल्ह्यातील जिंतूरच्या सरस्वती गवळी यांनी आपल्या उत्पादनाच्या बाजारपेठेची अडचण बोलून दाखवली. यावर विभागीय आयुक्त यांनी बचत गटाने निर्मित केलेले उत्पादनाबाबत संबंधित यंत्रणेने इतर जिल्ह्यांनाही याबाबत माहिती पाठवून मागणी घेता येईल तसेच राज्यातील ज्या उत्पादनाची मागणी आहे ते उत्पादन पाठविता येईल, तसेच बाजारपेठेची मागणी लक्षात घेत बचत गटानेही उत्पादन करावे असे पान २ वर

# संपादकीय पान

## थोर विचारवंत

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांची जयंती. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

'सर्वसाक्षी जगतप्ती।
त्याला नकोच मध्यस्ती।। '

हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

**विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली।**
**नितीविना गती गेली । गतिविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप विरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य्र पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनातंर्गत आयोध्या यात्रा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत ज्येष्ठ नागरीकासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' पहिला टप्प्यात अयोध्याकरीता जालना जिल्ह्यातील ५८३ लाभार्थ्यांनी दि. ०६ एप्रिल रोजी अयोध्या (श्रीराम मंदीर) येथे विशेष रेल्वेने प्रस्थान केले होते. या यात्रे दरम्यान सामाजिक न्याय विभागामार्फत आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. सदर तीर्थ यात्रा पूर्ण करुन सर्व लाभार्थी हे दि. १० एप्रिल रोजी जालना येथे परत आले असल्याची माहिती सहायक आयुक्त समाज कल्याण यांनी दिली आहे.

# भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम; मारुति

मनोजवम् मारुततुल्यवेगञ्, जितेन्द्रियम् बुद्धिमतां वरिष्ठम् ।।
वातात्मजं वानरयूथमुख्यं, श्रीरामदूतं शरणम् प्रपद्ये ।।

अर्थात् मनोवेगाने जाणारा, वाऱ्याप्रमाणे वेगवान, जितेंद्रिय, बुद्धिमानांमध्ये श्रेष्ठ, वायुपुत्र, वानरसमुदायाचा अधिपती आणि श्रीरामाचा दूत, अशा मारुतीला मी शरण आलो आहे.

मारुतीच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते.

लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच जवळचा वाटणारा एक देव म्हणजे 'मारुति' ! मारुति हा सर्वशक्तिमान, महापराक्रमी, महाधैर्यवान, सर्वोत्कृष्ट भक्त व संगीतज्ञानमहंता म्हणूनही प्रसिद्ध आहे. जीवनाला परिपूर्ण करणारे जे जे आहे, त्या त्या सर्वांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे मारुति. शक्ती, भक्ती, कला, चातुर्य आणि बुद्धीमत्ता यांनी श्रेष्ठ असूनही प्रभु रामचंद्रांच्या चरणी सदैव लीन रहाणार्या मारुतीच्या जन्माचा इतिहास आणि त्याची काही गुणवैशिष्ट्ये या लेखातून जाणून घेऊया.

**जन्माचा इतिहास**

राजा दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी 'पुत्रकामेष्टी यज्ञ' केला. तेव्हा यज्ञातून अग्निदेव प्रगट होऊन त्याने दशरथाच्या राण्यांसाठी पायस (खीर, यज्ञातील अवशिष्ट प्रसाद) प्रदान केला होता. दशरथाच्या राण्यांप्रमाणेच तपश्चर्या करणार्या अंजनीलाही पायस मिळाले होते आणि त्यामुळेच मारुतीचा जन्म झाला होता. त्या दिवशी चैत्रपौर्णिमा होती. तो दिवस 'हनुमान जयंती' म्हणून साजरा करतात. वाल्मीकिरामायणात (किष्किंधाकांड, सर्ग ६६) पुढीलप्रमाणे हनुमानाची जन्मकथा दिली आहे - अंजनीच्या पोटी हनुमान जन्मला. जन्म झाल्यावर 'उगवणारे सूर्यबिंब हे एखादे पक्व फळ असावे', या समजुतीने हनुमानाने आकाशात उड्डाण करून त्याकडे झेप घेतली. त्या दिवशी पर्वतिथी असल्यामुळे सूर्याला गिळण्यासाठी राहु आला होता. सूर्याकडे झेपावणारा हनुमान हा दुसरा राहुच आहे, या समजुतीने इंद्राने त्याच्यावर वज्र फेकले. ते हनुवटीला लागून ती छाटली गेली. यावरून त्याला 'हनुमान' हे नाव पडले.

**कार्य व वैशिष्ट्ये**

सर्वशक्तिमान : सर्व देवतांमध्ये फक्त मारुतीला वाईट शक्ती त्रास देऊ शकत नाहीत. लंकेत लाखो राक्षस होते, तरीही ते मारुतीला काही करू शकले नाहीत. जन्मतःच मारुतीने सूर्याला गिळण्यासाठी उड्डाण केले अशी जी गोष्ट आहे, तीतून वायुपुत्र (वायुतत्त्वातून निर्माण झालेला) मारुति हा सूर्याला (तेजतत्त्वाला) जिंकणारा होता हे लक्षात येते. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या तत्त्वांत वायुतत्त्व हे तेजतत्त्वापेक्षा



जास्त सूक्ष्म, म्हणजे जास्त शक्तिमान आहे.

भक्त : दास्यभक्तीचे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणून अजूनही मारुतीच्या रामभक्तीचेच उदाहरण देतात. आपल्या प्रभूंकरिता प्राणार्पण करण्यासाठी तो सदैव तयार असे. त्यांच्या सेवेपुढे त्याला शिवतत्व व ब्रह्मत्व यांची इच्छाही कवडीमोल वाटत असे. हनुमान म्हणजे सेवक व सैनिक यांचे मिश्रण होय !

बुद्धिमान : व्याकरणसूत्रे, सूत्रवृत्ति, वार्तिक, भाष्य आणि संग्रह यांत मारुतीची बरोबरी करणारा कोणी नव्हता (उत्तररामचरित ३६.४४-४६). मारुतीला अकरावा व्याकरणकार मानतात.

मानसशास्त्रात निपुण व राजकारणपटु : अनेक प्रसंगी सुग्रीवादि वानरच काय, पण रामानेही याचा सल्ला मानला आहे. रावणाला सोडून आलेल्या बिभीषणाला आपल्या पक्षात घेऊ नये, असे इतर सेनानींचे मत असता, मारुतीने 'त्याला घ्यावे' असे सांगितले व रामाने ते मान्य केले. लंकेत सीतेच्या प्रथम भेटीच्या वेळी तिच्या मनात स्वतःबद्दल विश्वास निर्माण करणे, शत्रुपक्षाला नामोहरम करण्यासाठी लंकादहन करणे, रामाच्या आगमनाबद्दल भरताला काय वाटते ते पहाण्यासाठी रामाने त्यालाच पाठविणे, यावरून त्याची बुद्धिमत्ता व मानसशास्त्रातील निपुणता दिसून येते. लंकादहनानेही त्याने रावणाच्या प्रजेचा रावणाच्या सामर्थ्यावरील विश्वास डळमळीत केला.

जितेंद्रिय : सीतेच्या शोधासाठी रावणाच्या अंतःपुरात गेलेल्या मारुतीची मनःस्थिति ही त्याच्या उच्च चारित्र्याची निदर्शक आहे. त्या वेळी तो स्वगत म्हणतो, 'निःशंकपणे पडलेल्या या सर्व रावणस्त्रिया मी ह्या अशा पाहिल्या खऱ्या; परंतु त्या पहाण्यामुळे माझ्या मनामध्ये विकार उत्पन्न झाला नाही.' - वाल्मीकिरामायण, सुंदरकांड ११.४२-४३.

अनेक संतांनीही या जितेंद्रिय अशा हनुमंताची पूजा बांधून त्याचा आदर्श समाजापुढे ठेवला. इंद्रियजित असल्यामुळेच मारुति इंद्रजितालासुद्धा हरवू शकला.

साहित्य, तत्त्वज्ञान व वक्तृत्वकला यांत प्रवीण : रावणाच्या दरबारातील त्याचे भाषण हा वक्तृत्वकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

संगीतशास्त्राचा प्रवर्तक : मारुतीला संगीतशास्त्राचा एक प्रमुख प्रवर्तक मानलेले आहे. समर्थ रामदासस्वामींनी त्याला 'संगीतज्ञानमहंता' असे संबोधले आहे.

चिरंजीव : दर वेळी प्रभु श्रीराम अवतार घेतात तेव्हा ते तेच असतात, मात्र मारुति दर अवतारी निराळा असतो. मारुति सप्तचिरंजीवांपैकी एक असला, तरी सप्तचिरंजीव चार युगांचा शेवट झाला की मोक्षाला जातात व त्यांची जागा अतिशय उन्नत असे सात जण घेतात.

**मूर्तिविज्ञान**

दासमारुति व वीरमारुति : हनुमानाची दासमारुति व वीरमारुति ही दोन रूपे आहेत. दासमारुति हा रामापुढे हात जोडून उभा असतो. त्याची शेपटी जमिनीवर रुळलेली असते. वीरमारुति युद्धाच्या पवित्र्यात असतो. त्याची शेपटी वर उभारलेली व उजवा हात मस्तकाकडे वळलेला असतो.

पंचमुखी मारुति : पंचमुखी मारुतीच्या मूर्ती बऱ्याच प्रमाणात आढळून येतात. गरुड, वराह, हयग्रीव, सिंह व कपिमुख ही ती पाच मुखे होत. या दशभुज-मूर्तींच्या हातात ध्वज, खड्ग, पाश इत्यादि आयुधे असतात. पंचमुखी देवतांचा एक अर्थ असा आहे की, पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार व उर्ध्वदिशा अशा पाचही दिशांना त्या देवतेचे लक्ष आहे किंवा तिचे त्यांच्यावर स्वामित्व आहे.

दक्षिणमुखी मारुति : दक्षिण शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. एक म्हणजे दक्षिण दिशा व दुसरा म्हणजे उजवी बाजू.

गणपति व मारुति यांची सुषुम्नानाडी नेहमी चालू असते; पण रूप बदलल्यावर थोडा बदल होऊन त्यांची सूर्य किंवा चंद्र नाडीही थोड्या प्रमाणात चालू होते.

शनीची साडेसाती व मारुतीची पूजा : शनीची साडेसाती असतांना तिचा त्रास कमी व्हावा म्हणून मारुतीची पूजा करतात.

**संदर्भ : सनातन संस्थेचा लघुग्रंथ 'मारुति'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

## जिल्हा कारागृहात आरोग्य शिबीर संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कारागृह वर्ग-१ व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि ओम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल रिसर्च सेंटर प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कारागृह वर्ग-१ येथे कैदयांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव प्रणिता भारसाकडे -वाघ, जिल्हा कारागृहाचे अधिक्षक काळे, जिल्हा सरकारी वकील बी. व्ही. इंगळे, डॉ. रितेश अग्रवाल, डॉ. विपुल जैन, डॉ. विजय जाधव, धनसिंह सुर्यवंशी, विजय लिणार, कैलास पवार, ङ लक्ष्मण उढाण, ईश्वर बिल्होरे, कार्तिक मदन व विशाल वाघमारे यांची उपस्थिती होती.

यावेळी शिबीरात कारागृहात कैद्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली या ई. सी. जी. , बी. पी. शुगर तपासणी करण्यात आली. हाडांचे आजार व त्वचेचे आजार यांची तपासणी व त्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

दीपसन रेमेडी
http://exclusivemaharashtra.com/
https://www.lokadhikarlive.com/
https://arjunastra.in/
वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
वेब पोर्टल, युट्युब चॅनल
वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय
वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन
9975387225 8390098886

## पान १ वरुन

### जालन्यात सावित्रीबाई ...

यमुनाबाई गरड, नितीन तायडे, राजेंद्र तिडके, शंकर तारो, गुरूमीतसिंह सैना, निलेश वानखेडे, सचिन वानखेडे, गणेश तरासे, भगवान तोडुळे, विजय तोंडुळे, ऋतुजा खरात, सचिन वानखेडे, निखील पगारे, सुनिल रत्नपारखे, बाबा पठाण, फिलीप्स उगले, अर्शद बागवान, नंदकिशोर जांगडे, बाबुराव मामा सतकर , शेख इब्राहिम, दशरथ तोंडुळे यांच्यासह बसपा, रिपाइं, रिपाइं, अ.भा. समता परिषद, महात्मा फुले विचार मंच, माळी महासंघ या संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी अर्जुनराव खोतकर यांनी महात्मा फुले यांचे विचार मनात घेवून कार्य करावे, सावित्रीबाई फुले यांचा पुणाकृती पुतळा जालना शहरात मनपाने जागेची पाहणी करून, पुतळा उभारावा, या पुतळ्यास आमदार फंडातून निधी दिला जाईल, असे सांगितले. आयुक्त संतोष खांडेकर यांनी संविधानाची शपथ घेवून, यांच्या विचाराने कार्य करावे, व त्यांचे स्वप्न पुर्ण करावे, असे ते म्हणाले. यावेळी भास्कर अंबेकर यांनी सावित्रीबाई फुले पुतळा शहरात बसविण्यात यावा, व त्यांच्या विचारावर सर्व समाजाने कार्य करावे असे आवाहन केले.

सुत्रसंचलन संतोष जमधडे यांनी केले. प्रास्ताविक दिपक वैद्य यांनी तर आभार आयोजक बाबासाहेब वानखेडे यांनी मानले. यावेळी महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### ग्रामपंचायतींसाठी ...

अनुसूचित जमाती अ.ज. २, महिला १ , नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. २५, महिला १२ आणि खुला प्रवर्गासाठी ५०, महिला २५.अंबड तालुका-ग्रामपंचायत संख्या १११, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. १४, महिला ७, अनुसूचित जमाती अ.ज. ३, महिला २ , नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. ३०, महिला १५ आणि खुला प्रवर्गासाठी ६४, महिला ३२.घनसावंगी तालुका-ग्रामपंचायत संख्या ९६, अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. १३, महिला ७, अनुसूचित जमाती अ.ज. २, महिला १ , नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. २६, महिला १३ आणि खुला प्रवर्गासाठी ५५, महिला २८.अशा एकूण जालना जिल्ह्यातील ७७८ ग्रामपंचायती मध्ये अनुसूचित जाती आरक्षीत अ.जा. ११२, महिला ५६, अनुसूचित जमाती अ.ज. १८, महिला ९, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित ना.मा.प्र. २१०, महिला १०५ आणि खुला प्रवर्गासाठी ४३८, महिला २१९ असणार आहे.

### जिल्हा प्रशासनामार्फत ...

धातुचे कुंपण, विद्यूतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या/लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीत-कमी संपर्क ठेवावा. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. जिल्ह्यातील सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीजापासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याची दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ या क्रमांकावर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधावा, असे अवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन गणेश महाडिक यांनी केले आहे.

### बचत गटाला ...

आवाहन केले.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील शाम बाला भोसले यांनी गावात ७५ गट आहेत, सीआरपी पदभरती करावी अशी मागणी केली. यावर १५ दिवसांच्या आत निर्णय घ्यावा असे निर्देश विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी दिले.

बीड जिल्ह्यातील ईट या गावातून शेतकरी गटाच्या मंगल रामप्रसाद डोईफोडे या आपल्या शेतीत काम करताना चर्चेत सहभागी झाल्या.

नांदेड जिल्ह्यातील माहूर येथून सपना पेडवाल यांनी चर्चेत सहभाग घेतला. आपल्या बचत गटाच्या अडचणींही त्यांनी मांडल्या. माहूर तालुक्यातील वाई प्रभाग येथील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून गावात यंदा ४५ लाख रुपये आले आहेत, गटातून गावात आर्थिक प्रगती झाल्याचे त्यांनी सांगितले. यावर विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी महिलांचे कौतुक केले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील आदर्श प्रभाग संघाच्या अंजली पवार यांनीही महिलांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ मिळाल्याची भावना बोलून दाखवली. गंगापूर तालुक्यातील सरला काकडे यांनीही चर्चेत सहभाग घेतला. जालना जिल्ह्यातील अकोला देव ता.जाफ्राबाद येथील श्रीमती सवडे यांनी बचत गटाने उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी मॉल आवश्यक असून या मॉलसाठी जागा पाहिजे अशी मागणी केली. हिंगोली जिल्ह्यातून दयानंद ढोबळे, तरडगव्हण, ता.शिरूर कासार जि.बीड येथून भाग्यश्री भोसले, जालना जिल्ह्यातील रेवगाव येथून गितांजली महिला प्रभाग संघाच्या योगिता गोरडे, परभणी जिल्ह्यातील शिवनेरी प्रभाग संघ ताड बोरगाव, धाराशिव प्रभाग संघ, यासह अनेक महिलांनी चर्चेत सहभाग घेतला. महिलांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नावर प्रशासनाच्या वतीने समजून घेत विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी महिलांच्या अडचणींबाबत संबंधित यंत्रणांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. जिल्हा पातळीवरून या उपक्रमाचे समन्वयक म्हणून काम पाहणारे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी या अडचणींबाबत कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## राजू वाघमारे यांना राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार २०२५ जाहीर



**जालना । प्रतिनिधी -** जालना समाजकार्य महाविद्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.राजकुमार म्हस्के तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रमेश गुजर व मार्गदर्शक प्रा. डॉ. सुधीर गायकवाड, प्रा.डॉ. रेणुका भावसार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना या विभागांतर्गत करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश खोसे यांनी केले तसेच या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना आदर्श स्वयंसेवक पुरस्कार-२०२५ राजू डिगांबर वाघमारे यांना देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित प्रा.डॉ. प्रविण कनकुठे, प्रा.डॉ. बालाजी मुंडे, प्रा.डॉ.मधु खोब्रागडे, प्रा.डॉ.दीपक बुक्तारे, प्रा.डॉ. नरसिंग पवार, प्रा.डॉ. मीना बोर्डे, श्री मलवार कार्यक्रमास्थळी उपस्थित या कार्यक्रमांना महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते सदरील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राजू वाघमारे यांनी केले.

## महात्मा ज्योतीबा फुले सार्वजनिक उत्सव समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील जि.प. प्रशाला (मुलांची) येथे महात्मा ज्योतीबा फुले सार्वजनिक उत्सव समिती २०२५ च्या वतीने महात्मा ज्योतीबा फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

# ज्ञान, शक्ती, भक्ती, ऊर्जा व बुध्दिमत्तेचा महासागर संकटमोचन महाबली हनुमान

महाबली हनुमान सर्वांचेच संकट मोचन आहेत. हनुमान जन्मोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला येत असते.चैत्रशुध्द प्रतिपदेला गुढीपाडवा म्हणजेच हिंदू धर्माचे नवीन वर्ष, यानंतर चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्मोस्तव आणि चैत्र पौर्णिमेला हनुमान जन्मोत्सव साजरा केल्या जाते.भगवान प्रभु राम चंद्र विष्णुचे अवतार आहे तर महाबली हनुमान शंकरजींचा अवतार आहे.मुख्यत्वेकरून हनुमानाची पूजा रूईच्या फुलांनी केली जाते.भारतात हनुमान जन्मोत्सवाला पुजाअर्चना करून भव्य शोभायात्रा मोठ्या प्रमाणात काढण्यात येते.महाबली हनुमान हे राम भक्त होते. त्यांच्याजवळ ज्ञान आणि गुनांचा मोठा भंडार होता.त्याचप्रमाणे आपल्यावर जेव्हा-जेव्हा संकटे ओढावतात तेव्हा-तेव्हा आपण हनुमानाला साकडे घालत असतो म्हणूनच हनुमानाला संकटमोचन म्हटल्या जाते.हनुमानाने रावण दरबारी रामाचे दुत म्हणुन चोख भुमिका बजावली.रावण महाग्यानी व राजनितीज्ञ होता. परंतु अहंकारी असल्याने त्याने संपूर्ण मर्यादांचे उल्लंघन करून हनुमानाच्या शेपटीला आग लावली. परंतु याचा रावणावर विपरीत परिणाम झाला. कारण हनुमान रामाचे दुत म्हणून रावण दरबारी गेले होते.त्यामुळे हनुमानाने संपूर्ण लंका आगीच्या स्वाधीन करून लंका दहन केले आणि हनुमानाने आपल्या रामभक्तीचे, ज्ञानाचे व शक्ती प्रदर्शन केले. कारण रामाचे संकट म्हणजे स्वत:चे संकट असे हनुमान समजत आणि रामाच्या सुरक्षेसाठी असुरी शक्तीचा संहार करण्यास मदत केली व असुरी शक्तीचे पानीपत केले.महाबली हनुमान रामकथेतील मुख्य सुत्रधार समजल्या जाते.कारण राम, लक्षण,सिता यांच्या सोबत हनुमानाची भुमिका वटवृक्षाच्या सावली सारखी अफाट असल्याचे दिसून येते.तीच प्रतीकृती आज भारतात प्रत्येक मोहल्लात व गावात दिसून येते. मोहल्या-मोहल्यात व गावा-गावागातील जवळपासच्या पटांगणामध्ये हनुमानजींचे मंदिर दिसुन येते.कारण गावातील कठीण प्रसंग असो किंवा आपल्या स्वत: वरील कठीण प्रसंग असो किंवा आनंदाचा प्रसंग असो किंवा शुभ प्रसंग अशा प्रसंगी सर्वच महाबली हनुमान यांना साकडे घालुन आलेले संकट व येणारे संकट दुर करण्यासाठी आणि सुख:शांती निर्माण व्हावी यासाठी पुजाअर्चना केली जाते व साकडे घातले जाते.श्रीराम,लक्षण व सीता १४ वर्षे वनवासात असतांना बजरंबली हनुमान व त्यांच्या संपूर्ण वानरसेनेणे सुरक्षा कवच बनुन कार्य केले. कारण बजरंबली हनुमान अहोरात्र रामाचाच जप करायचे म्हणुनच रामाचा जय-जयकार करतांना रामासोबतच हनुमानाचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. याप्रमाणे सीयाबल रामचंद्र की जय पवनसुत हनुमान की जय म्हणजेच जीथे राम तीथे आपल्याला बजरंग बली हनुमान दिसून येतो.सीतामाई यांनी ठरवीले की आपल्यासाठी रावणासारख्या बलाढ्य शत्रूशी वानरसेनेणे आणि हनुमान यांनी लढा दिला म्हणुन प्रत्येकाला काहीतरी द्यायचे म्हणून भेट वस्तू दील्या.यात हनुमानाचा पराक्रम पाहून त्या अती प्रसन्न होत्या. त्यामुळे हनुमानाला आगळीवेगळी मोठी वस्तु भेट देण्याचे ठरवीले.अशावेळी सीतामाईने आपल्या माहेरवरून मिळालेला नवरत्नाचा हार हनुमानाला आदरतीत्थाने भेट दिला. हनुमानाने हाराचा सन्मानाने स्वीकार केला.परंतु काही क्षणात हनुमानाने हारातील मनी दातांनी तोडायला सुरुवात केली. सीतेच्या तळपायाची आग मस्तकात गेली व हनुमानाला जाब विचारला तेव्हा हनुमान म्हणाले माई ज्या वस्तुत राम- सीता नाही त्याचा मला काय उपयोग?मी रामभक्त आहे असे म्हणत हनुमानाने आपली छाती फाडून आपल्या हृदयात राम-सीता आहे हे सीतामाईला दाखवून दिले.हनुमानाची भक्तीपाहुन प्रभुश्रीराम म्हणाले तुझे माझ्यावर एवढे ऋण आहे की मी तुला काय भेट देणार?यावर हनुमान म्हणाले हे प्रभुरामचंद्र द्यायचेच असेल तर एकच आशिर्वाद द्या,जीथे-जीथे तुमचे भजन-किर्तन सुरू असेल त्याचे श्रवण करण्याची मला संधी द्या.यावर श्रीराम तथास्तु म्हणाले! तेव्हापासून जिथे-जिथे रामनाम सुरू असते, रामाचा गजर होतो तिथे-तिथे महाबली हनुमानाचे नाव आदराने आपोआप येते.हनुमान जन्मोत्सवाला सर्वांनीच पवनपुत्र महाबली हनुमान यांना साकडे घालुन धरतीवरील कमी होत असलेल्या प्राणवायूची मात्रा पुर्ण करण्यासाठी देशातील संपूर्ण हनुमान भक्तांनी हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.कारण करोना काळात प्राणवायूचा पुरवठा न मिळाल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले होते.यामुळे वृक्ष लागवडीमुळे आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन व प्राणवायू मिळण्यास मोठी मदत होईल याचा फायदा मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतु यांना मोठ्या प्रमाणात मिळेल. यामुळे आपल्याला पृथ्वीतलावर हनुमान प्रगट झाल्याचे अवश्य दिसून येईल. सध्याच्या परिस्थितीत सोशल मीडियाच्या युगात आजचा युवा वर्ग बुध्दीने जरी हुशार आणि तर्बेज असला तरी शारीरिक दृष्ट्या परीपक्क नाही.महाबली हनुमान हे शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येकांनी हनुमानाचे नामस्मरण करून आपल्या आरोग्यासाठी दररोज व्यायाम करणे गरजेचे आहे. यामुळे उर्जा निर्माण होवून शरीर सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल.हे पवणपुत्र हनुमान या कलियुगात भ्रष्टाचार एवढा शिगेला पोहोचला आहे की मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने भ्रष्टाचार, बेरोजगारी ,भुकमरी,शेतकऱ्यांच्या समस्या व महागाईच्या रूपात असुरी शक्ती निर्माण झाली आहे.असुरी शक्तीमुळे आज सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.या कठीण प्रसंगी हे पवनपुत्र हनुमंता वायुरूपात या धर्तीवर प्रगट हो आणि वाममार्गाने चल-अचल संपत्ती कमवीणाऱ्यां असुरांना त्यांची जागा दाखवून सर्वसामान्यांना महागाईच्या संकटातून बाहेर काढ.कारण मुठभर भ्रष्टाचाऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.अशा संकट प्रसंगी हे संकटमोचन महाबली हनुमान आपण कोणत्याही रूपात पृथ्वीतलावर धावुन यावे अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो.आज हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून सर्वांनीच वृक्षारोपणाचा संकल्प करावा यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल.यामुळे गुरांना चारा, पशु-पक्षांना सावली व मानव-जीवजंतुंना शुद्ध हवा मिळण्यास मोठी मदत होईल.असे जर झाले तर प्रत्येक झाडात,पानात, फुलात व फळात आपल्याला महाबली हनुमानजींचे दर्शन अवश्य होईल.कारण महाबली हनुमान नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे.

एक मुखाने बोला जय जय हनुमान

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**



# वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक गोरगरीब मुस्लिम बांधवांच्या हिताचे

## आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन; सेवली व नेर येथे रमजान ईद निमित्त मनोमिलन कार्यक्रम संपन्न

**मंठा । प्रतिनिधी -** वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक हे सर्वसामान्य गोरगरीब मुस्लिम बांधवांच्या हिताची असून मोजक्या धनदांडग्या मुस्लिमांनी कब्जा केलेली संपत्ती मुस्लिम बांधवांसाठीच वापरली जाणार आहे वक्फ बोर्डावर आधी मुस्लिम सदस्य असणं बंधनकारक होते. पण सुधारित विधेयकानुसार गैर मुस्लिम सदस्यांचा समावेश करणं बंधनकारक करण्यात आले आहे. वक्फ बोर्डावर आधी सरकारकडून चार सदस्यांची नियुक्ती करण्यात येत होती, तर चार सदस्य निवडून येत होते. आता वक्फ बोर्डाच्या सुधारित विधेयकानुसार ८ सदस्यांमध्ये किमान २ सदस्या गैर मुस्लिम असतील. आधी वक्फ ट्रिब्युनलचा फैसला अंतिम होता, त्याला कोर्टात आव्हान देता येत नव्हते. पण सुधारणा विधेयकानुसार, वक्फच्या कोणत्याही वादग्रस्त संपत्ती विरोधात हायकोर्टात जाता येणार आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

जालना तालुक्यातील सेवली व नेर या ठिकाणी मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने आयोजित रमजान ईद निमित्त मनोमिलन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की,

मशीद असलेली जमीन किंवा मुस्लीम धर्म कार्यासाठी वापर होणाऱ्या वस्तूवर वक्फ बोर्डाचा दावा असायचा. पण आता जमीन दान केली नसेल आणि त्यावर मशीद असेल तर ती संपत्ती वक्फची होणार नाही. मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचे अधिकार आधी आयुक्ता होते. पण आता नव्या विधेयकानुसार, जिल्हाधिकारी वफ्कच्या जमिनीचे सर्वेक्षण करतील. वादग्रस्त जमिनीचा ताबा वाद मिटेपर्यंत सरकारकडे राहणार आहे.

मुस्लिम धर्मगुरू, मौलवी यांच्यासह सुशिक्षित मुस्लिम समाज बांधवांनी या विधेयकाचे स्वागत केले असून खऱ्या अर्थाने गोरगरीब मुस्लिम समाज बांधवांचा या माध्यमातून फायदा होणार असल्याचे म्हटले आहे. आतापर्यंत काही मोजक्या धनदांडग्या आणि समाजाचे ठेकेदार बनलेल्या ठराविक मुस्लिम समाजाच्या लोकांनी वक्फ बोर्डाच्या नावाने चुकीच्या पद्धतीने जमिनी हडप केल्या होत्या अत्यंत किरकोळ भाडेपट्ट्यामध्ये वर्षानुवर्ष या जमिनी वापरण्यात येत होत्या परंतु या सुधारणा विधेयकामुळे निश्चितपणे या सर्व बाबींना न्याय मिळणार असून यामधून मिळणारा पैसा सर्वसामान्य मुस्लिम बांधवांच्या शैक्षणिक सामाजिक आरोग्य व इतर सर्वांगीण विकासासाठी केला जाणार आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.




विरोधक वक्फ संशोधन विधेयकाला असंवैधानिक का म्हणत आहेत ते माहीत नाही. हे विधेयक असंवैधानिक कसं आहे हे सांगण्यासाठी त्यांच्याकडे एकही कारण नाही. वक्फ सुधारणा विधेयक मुस्लिमांच्या विरोधात नाही. फक्त वक्फ मालमत्तांचे कामकाजाच्या संदर्भात आणि व्यवस्थापना सुधारण्याच्या पार्श्वभूमीवर आहे. विरोधक मुस्लिमांची दिशाभूल करत असून हे विधेयक मुस्लिम विरोधी नाही, ते गरीब मुस्लिमांच्या विकासासाठी आणले गेले आहे. आत्ता वक्फच्या ८.७२ लाख मालमत्ता आहेत. त्यातून १२ हजार कोटींचे उत्पन्न अपेक्षित होते परंतु त्यामधून नाममात्र उत्पन्न मिळाले आहे आणि ते नाममात्र मिळालेले उत्पन्न देखील मुस्लिम समाज बांधवांचा कुठेही विकास होईल अशा प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

अनेक दशकांपासून वक्फ बोर्डामध्ये पारदर्शकता आणि जबाबदारीचा अभाव होता. यामुळे विशेषतः मुस्लिम महिला, गरीब मुस्लिम यासारख्या सर्वसामान्य गोरगरीब मुस्लिम बांधवांच्या हिताचे नुकसान झाले आहे. संसदेने बहुमताने मंजूर केलेल्या वक्फ बोर्डाच्या माध्यमातून पारदर्शकता येईल आणि लोकांच्या हक्कांचे रक्षण होईल. वक्फ बोर्ड एक घटनात्मक संस्था आहे. तसेच ती धर्मनिरपेक्ष असली पाहिजे. या विधेयकामुळे एकाही मुस्लिमाचं नुकसान होणार नाही. उलट कोट्यवधी मुस्लिमांचा फायदाच होईल. असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले

सेवली व नेर येथे रमजान ईद निमित्त आयोजित मनोमिलन कार्यक्रमासाठी अब्दुल हमीद सरपंच आदिल पठाण अजीम पटेल अकबर पटेल सईद पटेल मन्ना खान नसीर पटेल ताहेरखान जलील पटेल अमजद खान नईम पटेल शेखर पठाण अनिस खान इरशाद खान फरहाण अन्सारी खाजा कुरेशी अहमद पठाण गौस कुरेशी मिराज खान अकबर शेख जफर शेख नाझीम शाह आलिम मुजफ्फर साहब डॉ रियाज शेख खलील चौधरी रियाजुद्दीन चौधरी सय्यद इसाक जिया चौधरी सय्यद अहमद कुरेशी मझर सय्यद शेख अमीन रफिक तांबोळी रफिक मौलाना इमरान खान मोहम्मद भाई सत्तार भाई मोहम्मद अली सय्यद रफीक मज्जू चौधरी खाजा खान समंदर खान नदीम भाई सुभान खान नासिर पठाण यांच्यासह ज्ञानेश्वर शेजुळ जिजाबाई जाधव विकास पालवे डॉ. शरद पालवे प्रकाश टकले गजानन उपाड विक्रम उफाड विनोद राठोड दिलीप जोशी कोमल कुचेरिया समाधान वाघमारे सौरभ माहुरकर प्रमोद भालेकर गणेश मोरे राजेश राठोड दिगंबर जायभाय राहुल सदावर्ते नंदकुमार घोडे आदेश खाबिया किशोर चव्हाण रावसाहेब बाहेकर वसंतराव सहाने परमेश्वर गायके कैलास गायके कैलास पवार विलास पवार सोनू कुरेवाड राजू पवार गोविंद खरात गजानन खराबे बाळू कुलकर्णी दिलीप पवार विजय घाडगे राहुल उफाड राम तांदुळकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

---

# रक्तदान शिबिराच्या माध्यमातून मराठा महासंघाकडून समतेचा संदेश - आ. खोतकर

## दुसऱ्यांसाठी जगणे म्हणजे खऱ्या अर्थाने पुरुषार्थाचे काम - भास्करराव आंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** महापुरुषांना जाती- जातीत वाटता येत नाही; जे आज अपेक्षितही नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, अशा महापुरुषांच्या जयंतीचे औचित्य साधून शिबिराच्या माध्यमातून १०१ रक्तदान करण्याचा संकल्प करून मराठा महासंघाने प्रत्यक्ष कृतीतून समतेचा संदेश दिला, असे गौरवोद्गार आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलताना काढले.

महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठा महासंघातर्फे शुक्रवार दि. ११ एप्रिल रोजी येथील जिल्हा महिला व बाल रुग्णालयात आयोजित भव्य रक्तदान शिबिराचे उद्घाटन आ. अर्जुनराव खोतकर यांच्याहस्ते करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर हे होते. व्यासपीठावर जिल्हा महिला व बाल रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुदामराव गवारे, डॉ. प्राची तारशेट्टीवार, कदीम जालना ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, डॉ. लोंढे, डॉ. सच्चिदानंद तोर, कार्यालयीन अधीक्षक श्री. चव्हाण, पंडितराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे, शहानवाज अहमद, संयोजक सुभाष चव्हाण, संजय देठे किशोर गरदास, मंगेश मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात भास्करराव आंबेकर म्हणाले की, आजच्या ठिकाणी रक्तदान शिबिर होत आहे, ते महिला व बाल रुग्णालय सेवा आणि सुविधेच्याबाबतीत महाराष्ट्रातून द्वितीय आले आहे, हा निश्चितच आनंदाचा क्षण आहे. जे शरीराने आजारी असतात, त्यांना दुरुस्त करण्याचे काम डॉक्टर मंडळी करतात तर प्रत्येकाचे मन चांगले असावे यासाठी प्रयत्न करणारी मंडळी म्हणजे मराठा महासंघाचे पदाधिकारी. काही महिन्यापूर्वी महाराष्ट्रभर ओबीसी आणि मराठा वाद चिघळला होता. आपल्या जिल्ह्यात मात्र मराठा महासंघाने चांगल्या पद्धतीने परिस्थिती हाताळून समाजाला निकोप ठेवण्याचे काम केले आहे. मोठ्या प्रमाणात सामाजिक काम करणारा, अन्यायाविरुद्ध तुटून पडणारा अशी मराठा महासंघाची ओळख आहे. राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यापेक्षा संघटनेचे काम करणारी ही मंडळी अधिक काम करते याची आपणास जाणीव असल्याचे सांगून, स्वतःसाठी सर्वच जगतात. मात्र दुसऱ्यांचा विचार करून जगणारी ही मंडळी खऱ्या अर्थाने पुरुषार्थाचे काम करत असल्याचा आपणास सार्थ अभिमान आहे, असे ते म्हणाले.



यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख म्हणाले की, आजचा दिवस आपल्या संघटनेसाठी गौरवाचा आहे. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आम्ही हे रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. या महापुरुषांनी दिलेले सामाजिक समतेचे आणि न्यायाचे विचार आम्हाला प्रेरणा देत राहतात. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, समाजात एकोपा आणि माणुसकी वाढविण्याचे हे एक प्रभावी माध्यम आहे. आज १०१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

या शिबिरात १०१ जणांनी स्वयंस्फूर्त रक्तदान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इंजि. शुभम टेकाळे, प्रास्ताविक अरविंद देशमुख यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार मराठा महासंघाचे जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ यांनी मानले. याप्रसंगी शितल बारोटे, किशोर गरदास, संजय देठे, रमेश जाधव, दिनकर घेवंदे, बंडु सूरडकर, सुभाष चव्हाण, ड. शैलेश देशमूख, संतोष कर्हाळे, मंगेश मोरे, रामकिसन राऊत, विक्रम गाढे, मंगेश चव्हाण, श्री. सराटे, विक्रम आगटे, शुभम चव्हाण, संतोष पडूळ, अनिल चव्हाण, ज्ञानेश्वर जाधव, विठ्ठल रसाळ,आकाश वानखेडे आदींची उपस्थिती होती.

---

# शिधापत्रिका ई-केवायसी करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी -** राज्यात रेशनकार्ड धारकांना घरबसल्या ई-केवायसी करण्यसासाठी केंद्र सरकारने मेरा ई-केवायसी ॲप सुरु केले आहे. इतकेच नाही तर जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदारही शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसीसाठी मागे लागून करुन घेत आहेत. तरीही राशन कार्डधारकाकडून उत्साहाने ई-केवासीचे काम होत नसल्याची खंत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी व्यक्त केली. दरम्यान आता शासन स्तरावरुन ३० एप्रिल पर्यंत शिधापत्रिकाधारकांना ई-केवासी करण्यासाठी मुदतवाढ दिली असून, आता ही शेवटचीच संधी असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

आतापर्यंत २९ टक्के लाथार्थ्यांनी ई-केवासी केली नाही. नागरीकांनी एप्रिल शेवटपर्यंत ई-केवासीकडे पाठ फिरवल्यास ३० एप्रिल नंतर त्यांचा धान्य पुरवठा बंद केला जाईल, असा गंभीर आणि शेवटचा इशार जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिला. राशन कार्डसाठी ई-केवासी शासनाने मागील ६-७ महिन्यांपासुन सुरु केली आहे. मध्यंतरी तांत्रिक अडचणी मुळे या माहीमेला गती येत नव्हती. यामुळे शासनाच्या वतीने मुदतवाढ देण्यात आली. मागील मुदतीनंतर २८ फेब्रुवारी, ३१ मार्च आणि आता एप्रिल ३० पर्यंत म्हणजे ३ महिने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी सर्व लाभार्थी यांनी ई-केवासी करुन घ्यावी, अनेक कार्डधारकांचे अंगठे ई-पॉश मशीनवर स्कॅन होत नव्हते, यामुळे आता या राशन कार्डधारकांचे ई-पॉश मशीनवर डोळे स्कॅन करुन ई-केवासी प्रक्रीया पुर्ण करता येत आहे. यामुळे ज्या त्या भागातील नागरीकांनी आपल्या जवळच्या राशन दुकानात जाऊन तात्काळ ई-केवासी करुन घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात येत आहे.

---

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पदयात्रेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ व्या जयंती निमित्ताने जिल्हा प्रशासन, सर्व शैक्षणिक संस्था, एनएसएस, एनसीसी, एनवायके व इतर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात जयभिम पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

जालना शहरात देखील जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरु युवा केंद्र, जिल्हा परिषद, विविध क्रीडा संघटना, मंडळे यांच्या विद्यमाने दि. १३ एप्रिल, २०२५ सकाळी ०७.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा (नुतन वसाहत) येथे माळा अर्पण करून पदयात्रेची सुरुवात होणार आहे. ही पदयात्रा शनि मंदीर - गांधी चमन- डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (मस्तगड) यांच्या पुतळ्यास माळा अर्पण करून पुर्ण होणार आहे. या पदयात्रेस जालना जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, सर्व विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती राहणार आहे.

जिल्ह्यातील शाळा/महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षकांसह, एनएसएस, एनसीसी, स्काऊट/गाईडस विद्यार्थी तसेच सर्व क्रीडा संघटना पदाधिकारी व खेळाडू यांनी पदयात्रेत मोठया संख्येने सहभागी व्हावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा प्रशासन, जिल्हा शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, जालना यांचेवतीने करण्यात आले आहे.

---

# अंजलीसह घाटोळकर कुटुंबासाठी डॉ. कोरडे ठरले देवदूत

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** एकीकडे पुण्याच्या हॉस्पिटलमध्ये घडलेल्या गैरप्रकारमुळे वैद्यकीय सेवेकडे समाज संशयाच्या नजरेने बघत असताना दुसरीकडे जालना येथील डॉक्टर कृष्णा कोरडे यांनी रसवंती केस गेल्यामुळे डोक्याला जखम झालेल्या अंजलीला केलेल्या मदतीमुळे डॉक्टर कोरडे यांचे समाज माध्यमातून कौतुक होत आहे डॉक्टर कोरडे यांनी अंजलीच्या उपचाराचा खर्च घेतलाच नाही तर अंजलीच्या यापुढील शिक्षणाचा व त्यांच्या कुटुंबाचे पालकत्व स्वीकारल्यामुळे डॉक्टर कोरडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

अंजलीची घरची परिस्थिती जेमतेम वडिलांचे छत्र हरवले ते त्याचाच पोट भरण्यासाठी सावरगाव माळ येथे अंजलीने रसवंतीचा व्यवसाय सुरू केला होता मात्र काही दिवसापूर्वी रसवंती चालवत असताना चुकून अंजलीच्या डोक्याचे केस अचानक मशीन मध्ये गुंतल्याने डोक्याला खूप मोठी इजा झाली होती आणि हे सर्व परिसरात कळतच सावरगाव माळी येथील सरपंच निवृत्ती दादा यांनी व गावातील मंडळींनी अंजलीला तातडीने कलावती सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटल जालना येथे उपचारासाठी घेऊन गेले व उपचार करत असताना उपचाराचा खर्च कसा करणार हा प्रश्न समोर उभा असताना गावचा सरपंच कसा असावा याची प्रचिती सरपंच निवृत्ती दादा यांनी करून दिली व सावरगाव माळ गावातील सरपंच निवृत्ती दादा संवेदनशील जनतेने अंजलीला सर्वतोपरी मदत करण्याचे ठरविले मामाच्या गावाचे माजि सरपंच अनिल नवले व सावरगाव माळी येथील सरपंच निवृत्ती दादा यांना सोबत व मामाच्या मित्रांच्या माध्यमातून डॉक्टर कोरडे यांच्यासोबत चर्चा केली जालन्यातील कलावती हॉस्पिटल येथील डॉक्टर कोरडे यांनी समाजभान आणि मुख्यमंत्री निधीतून मदत मिळवून दिली उपचारानंतर हॉस्पिटलचे उर्वरित बिल् देखील घेतले नाही याउलट पालक म्हणून अंजलीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत कुटुंबाची पुढील जबाबदारी ही कलावती हॉस्पिटलच्या माध्यमातून स्वीकारतील मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत केली त्यासंबंधीचे पत्र आमदार नारायण कुचे व समाज भान टीम च्या उपस्थितीत अंजलीला स्फूर्त करून तिला व तिचा कुटुंबाला मोठा दिलासा दिला आहे एकीकडे पुण्याच्या हॉस्पिटलमध्ये घडलेल्या गैर प्रकारामुळे वैद्यकीय सेवेकडे संशयाच्या नजरेने बघत असताना दुसरीकडे जालन्यातील डॉक्टर कोरडे यांनी गरीब व निराधार असणाऱ्या अंजलीला केलेल्या मदतीमुळे आणि त्यांच्या संवेदनशीलते बद्दल पंचक्रोशीतून डॉक्टर कोरडे आणि



त्यांच्या टीमचे भरभरून कौतुक होत आहे तर समाज भान वैद्यकीय मदत कार्यात संवेदनशील पणे नेहमी प्रतिसाद देणाऱ्या डॉक्टरच्या आज केलेल्या मदतीबद्दल समाज भान टीम व घाटोळकर परिवार कायम ऋणी राहील डॉक्टर कोरडे यांच्याकडून यापुढेही अशीच राहून सेवा घडावी अशी सदिच्छा दिल्या.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.